ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg No. PNC-116, Licence No. 34

वर्ष ४० | महाराष्ट्र दिन विशेषांक | अंक ९ आणि १०

॥ श्री ॥

## दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि., पुणे ३०

कां जगाचे आंध्य फेडितु । श्रियेचीं राउळें उघडितु ।
निघे जैसा भास्वतु । प्रदक्षिणे ॥ —श्री ज्ञानेश्वरी

महाराष्ट्र राज्याच्या वर्धापनदिनानिमित्त महाराष्ट्र राज्यास आमच्या हार्दिक शुभेच्छा व्यक्त करीत आहोत. या प्रसंगी आमचे भागधारक, ठेवीदार व हितचिंतकांना अभिवादन व हार्दिक शुभेच्छा.

शुभ्र दाणेदार साखरेचे रेक्टिफाईड व डिनेचर्ड स्पिरीटचे आणि उच्च प्रतीच्या देशी व विदेशी मद्यांचे उत्पादक.

फोन : ५८०९५ – पुणे
तार : श्री. – पुणे

ज. चं. आगाशे, ज्ञा. चं. आगाशे
जॉईंट मॅनेजिंग डायरेक्टर्स

★ ठेवींची सुरक्षितता ★ आकर्षक व्याजाचे दर ★ विनम्र तत्पर सेवा
यासाठी आपली निवड

## दि सांगली बँक लिमिटेड

रजिस्टर्ड ऑफिस
राजवाडा चौक, सांगली

— पुण्यातील शाखा —

(१) रविवार पेठ * (२) लक्ष्मी रोड (३) सदाशिव पेठ *
(४) डेक्कन जिमखाना (५) एरंडवणा (६) शिवाजीनगर

* SAFE DEPOSIT LOCKERS

वा. त्रिं. कारके
चेअरमन

१ मे आणि १५ मे १९७४

# तुमच्या उफाळणाऱ्या जीवनाला साजेसे ठाकरसी कापड





स्वच्छंद मजेत हवे तसे मुक्तपणे भटकणाऱ्यांसाठी ठाकरसीचे मोकळे मोकळे वाटणारे सुती कापड अगदी साजेसे असते. पॉप्लिन, व्हॉन्स, वॉयल्स, कॅम्ब्रिक्स—कुठेहि नेसाल तरी शोभून दिसते. शहराबाहेर [illegible] रानोमाळ भटकत असताना किंवा शहरात प्रतिष्ठितपणे फिरत असताना वापरले तरी उपयुक्त ठरते. ठाकरसीच्या सुती कापडाने थंडावा राहतो नि मोकळे मोकळे निश्चिंत वाटते. तुमच्या आवडीची प्रिंट्स व रंग जरूर पसंत करा. रानावनातील भटक्या जीवनाची तुम्हाला हौस असेल तर त्यासाठी ठाकरसीच्या सुती कापडासारखे दुसरे कापड नाही. अगदी हवे तसे हे कापड आहे. स्वच्छंद भटकंतीसाठी मोकळे मोकळे तरल कापड. गाऊन, फ्रॉक वगैरेचे (ड्रेस मटेरियल) कापड, शर्टिंग व सूटिंग.

ठाकरसीचे सुती कापड व चुरगळण्याच्या चाचणीला उतरेल असे 'टेबिलाइज्ड' असते आणि आटू नये म्हणून 'सॅन्फोराइज्ड' असते.

## ठाकरसी ग्रूप ऑफ मिल्स,

[illegible] • हिन्दुस्थान युनिट नं. १ • हिन्दुस्थान (इंडिकन) युनिट नं. २
१६, [illegible] स्ट्रीट, मुंबई-१.

Madison/TGM/17 Mar

# ☆ अर्थ ☆

बुधवार, १ आणि १५ मे, १९७४





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


*“ अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.*

### सर्व जग संकटाच्या खाईत जात आहे

संयुक्त राष्ट्र संघटनेचे चालू अधिवेशन अल्जीरिआच्या मागणीवरून बोलाविण्यात आले. सर्व जगातील कच्च्या मालाचे उत्पादन व पुरवठा ह्यांच्याबद्दल चर्चा करण्याचा अधिवेशनाचा मुख्य उद्देश आहे. अरब देशांनी तेलाचा उपयोग राजकीय हत्यार म्हणून केल्यापासून इतर कच्च्या मालाच्या उत्पादक देशांनाही ह्या धोरणाची महती कळली आहे. ह्याचा परिणाम जग संकटाच्या प्रचंड भोवऱ्यात सापडण्याचा धोका जवळ येण्यात झाला आहे. क्लब ऑफ रोम म्हणून एक आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांची संघटना आहे. तिने जगाच्या भवितव्याविषयी गेल्याच महिन्यात एक अहवाल प्रसिद्ध केला आहे. अहवाल म्हणतो की जगातील समाज असह्य ताणामुळे दुभंगलेला आहे. राहणीच्या मानात व समृद्धी मिळविण्याच्या संधीत कमालीची विषमता पसरलेली आहे. कोट्यवधी स्त्री-पुरुष कसेबसे जिवंत राहत आहेत. त्याचबरोबर काही थोड्या लोकांच्या सुखासाठी निसर्गाची लूट करण्यात येत आहे आणि निसर्गात प्रदूषण फैलावण्यात येत आहे. त्यामुळे पुढील पिढ्यांचे भवितव्य भीषण बनत आहे. सध्या जगापुढे तेलाची समस्या उभी आहे. पण ही समस्या वरवर दिसणारी आहे. अन्नधान्याची आणि औद्योगिक शक्तीची भयंकर टंचाई तिची दृश्य रूपे आहेत. ह्या समस्येचे परिणाम फार दूरवर पसरणारे आणि खोलवर जाणारे आहेत. जगाचा कोठलाही भाग परिणामापासून सुटू शकणार नाही. जगातील गरीब देश आणि गरीब लोक ह्यांना अतिशय मोठ्या आपत्तीशी सामना करावा लागणार आहे. त्यांच्या जीवनावश्यक प्राथमिक गरजा भागेनाशा झाल्या आहेत. व्यापार, मदत आणि पैसा राजकीय हेतूसाठी वापरला जात आहे.

---

### सामाजिक-आर्थिक न्यायाची व्याख्या कोणती ?

हिंदमधील समाजाची पुनर्घटना करण्याचा प्रश्न निघाला की नवसमाज निर्मितीचे ध्येय सामाजिक-आर्थिक न्याय, असे सांगण्यात येते. तथापि, ह्या ध्येयाची स्पष्ट अशी कल्पना बहुधा देण्यात येत नाही. मध्यवर्ती सरकारच्या अवजड उद्योग खात्याचे मंत्री श्री. टी. ए. पै ह्यांनी जयपूर येथे एका व्याख्यानमालेत तसा प्रयत्न केला आहे. ते म्हणतात की एखाद्या प्रगत औद्योगिक देशातील सामाजिक-आर्थिक न्यायाची कल्पना व अविकसित अगर अर्धविकसित शेतीप्रधान देशांतील कल्पना एकाच प्रकारची असण्याची आवश्यकता नाही. मागास देशांतील अशा न्यायाच्या कल्पनेत अनेक गोष्टींचा समावेश झाला पाहिजे. प्रथम त्या देशाने शेती व उद्योगधंदे ह्यासाठी कार्यक्षम पाया घातला पाहिजे. आर्थिक बाबतीत पुढाकार घेण्याची व आर्थिक व्यवहार करण्याची वृत्ती सर्वत्र पसरविण्याची काळजी घेतली पाहिजे. ती घेण्यात आली तरच प्रादेशिकदृष्ट्या व समाजातील वर्गदृष्ट्या संपत्तीचे वाजवी व अधिक चांगले वितरण करता येणे शक्य होईल. शिक्षण आणि आरोग्य ह्यांसारख्या सामाजिक सेवांवर विशेष भर देण्यात आला पाहिजे. विकासाची गती सतत चालू राहावी म्हणून उत्पादनाचे व वितरणाचे नियोजन करण्यात आले पाहिजे. त्यामुळे विकासासाठी लागणारी साधने निर्माण होत राहतील, त्याचबरोबर समाजातील ज्या वर्गांनी अनेक पिढ्या प्रतिकूल परिस्थितीशी सामना केला त्यांच्यासाठी परिस्थिती प्रेरणा देणारी केली पाहिजे. त्यासाठी उपलब्ध असलेल्या संधी त्यांना अग्रहक्काने देण्यात आल्या पाहिजेत. सामाजिक न्याय देण्याचाच हा प्रकार आहे.

---

### डिझेल तेलाचा तुटवडा पडण्याची भीती

हिंदच्या अर्थव्यवस्थेवर इंधनाच्या टंचाईचे सावट पडलेले आहे. खनिज तेल व तज्जन्य पदार्थ दुर्मिळ होण्याची भीती इतर देशांप्रमाणे भारतालाही वाटत आहे. औद्योगिक शक्ती पुरविणाऱ्या इंधनाच्या विकट परिस्थितीचा विचार करण्यासाठी दिल्ली येथे एका साप्ताहिकाने परिसंवाद घडवून आणला होता. त्यात ह्या विषयातील तज्ज्ञांनी आपले विचार व्यक्त केले. पेट्रोलिअम खात्याचे चिटणीस श्री. पी. के. दवे म्हणाले की ह्या वर्षी इंधनासाठी लागणारे तेल आणि रॉकेल ह्यांचा पुरवठा बेतावेतानेच होईल. परंतु नॅफ्था आणि मोटार-स्पिरिट ह्यांच्या पुरवठ्याबद्दल चिंता करण्याचे कारण राहणार नाही. पेट्रोलपासून निर्माण करण्यात येणाऱ्या पदार्थांत डिझेल तेल आणि हलके डिझेल तेल ह्यांना फार महत्त्व आहे. कारण डिझेल तेल रस्त्यावरील वाहतूक करणाऱ्या मोटारींना आवश्यक असते आणि हलके डिझेल तेल शेतीला पाणीपुरवठा करणाऱ्या पंपांना लागते. ह्या दोन्ही प्रकारच्या तेलांच्या उत्पादनात कपात करण्यात येण्याची शक्यता नाही. तथापि रस्ते बांधण्यासाठी लागणारे खडेडांबर निर्यातीसाठी राखून ठेवण्यात आले आहे. त्यामुळे ते मात्र मिळणे शक्य होणार नाही. मुंबईजवळील समुद्रात तेलाचा आढळ अलीकडे झाला आहे. तेलाच्या बाबतीत भारतात लागलेला हा शोध सर्वांत

आशादायक म्हटला पाहिजे. पेट्रोलऐवजी इतर प्रकारचे योग्य इंधन सापडले तरीसुद्धा भारतामधील खनिज तेलाचा शोध चालूच ठेवण्यात येणार आहे. ह्या परिसंवादात ४० एंजिनिअर्स आणि शास्त्रज्ञ ह्यांनी भाग घेतला होता. त्यात सरकारी खात्यातील व खाजगी उद्योगधंद्यांतील प्रतिनिधी होते.

---

## सरकारीकरण म्हणजे नुकसानीकरण

### फायदा दाखविण्याची सक्ती आवश्यक

सरकारी कारखान्यांतील व्यवस्थापक आणि कामगार यांची देशातील आर्थिक विकासाकडे पाहण्याची दृष्टी उद्योगधंद्यांचे राष्ट्रीयीकरण करण्यापूर्वी जी होती तीच आजही आहे. ती म्हणजे स्वतःला जास्तीत जास्त काय मिळेल आणि ते कसे मिळविता येईल हीच होय.

खासगी कारखान्यांच्या व्यवस्थापकांच्या परिषदा ताजमहाल हॉटेलात होतात, तशाच किंवा त्यापेक्षा अधिक भपकेबाजपणे सरकारी व्यवस्थापकांच्याही तेथेच होतात. खासगी कारखान्यांतील कामगार काम बंद पाडून अधिक पगार, बोनस, आदी फायदे मिळवितात तोच कित्ता सरकारी कारखान्यांतील कामगार गिरवितात. मग सरकारीकरण किंवा राष्ट्रीयीकरण केल्याने समाजवादी समाजरचनेच्या जवळ आपण जात आहो असे उंच स्वराने प्रतिपादणाऱ्यांच्या सांगण्याला काही अर्थ आहे का ?

सरकारीकरणाचा हेतू देशाचा आर्थिक विकास व्हावा हाच आहे ना ? मग हे कारखाने खर्चापेक्षा अधिक उत्पादन करून वर्षअखेरीस ताळेबंदात राष्ट्रासाठी काही तरी आपण दिल्याचे दाखवितात का ? सरकारीकरण याचा अर्थ कारखाना नुकसानीत चालणे असा होतो आहे. या कारखान्यांनी फायदा दाखविलाच पाहिजे अशी कायदेशीर सक्ती त्यांच्या व्यवस्थापकांवर आणि कामगारांवर झाली पाहिजे.

कारखान्याच्या भांडवलावरील लाभांश ( डिव्हिडंड ) जितके टक्के असेल तितके टक्के बोनस कामगारांच्या एकूण पगारावर देण्यात यावा. म्हणजे फायद्यातील विभागणी समसमान होईल. बोनस ही फायद्यातील विभागणी आहे हे तत्त्व मान्य केले पाहिजे. येथे सरकारची दृष्टी बदलली पाहिजे. बँका, कारखाने यांनी फायदा दाखविण्याइतके कार्यक्षम व्यवस्थापन केले नाही तर देशाची आर्थिक स्थिती अधिकच बिघडेल.

नासिक येथील नोटा छापण्याचा कारखाना चोवीस तास चालविला म्हणून देशाची परिस्थिती सुधारणार नाही. कारण नोटा छापण्याच्या कागदाचीही शेवटी टंचाई येईल. कारण तो कागद आपण आयात करतो. देशाची आर्थिक स्थिती सुधारली पाहिजे असे सरकारने मानले पाहिजे व तशी वागणूक केली पाहिजे. सर्व क्षेत्रांतील चैन, उधळपट्टी बंद होऊन कार्यक्षम कारभार करणे हे राष्ट्रीय कर्तव्य मानले गेले पाहिजे."

—डॉ. वि. म. दांडेकर


## जनता सहकारी बँक लि., सांगली

रजिस्टर्ड ऑफिस : हु. पत्रावळ रोड, कराळे बिल्डिंग, सांगली-

खालीलप्रमाणे व्याजाच्या आकर्षक दराने ठेवी स्वीकारल्या जातात.

| | | |
|---|---|---|
| (१) सेव्हिंग्ज :— | ... | ४·५० टक्के |
| (२) कॉल ठेव :— (कमीत कमी रु. ५,०००) | ... | |
| | ७ दिवस नोटीस | ६·०० टक्के |
| | २१ दिवस नोटीस | ६·२५ टक्के |
| (३) शॉर्ट टर्म डिपॉझिट :— (कमीत कमी रु. ३,०००) | | |
| | ९१ दिवस | ७·५० टक्के |
| | ६ महिने | ७·७५ टक्के |
| (४) मुदत ठेव :— | | |
| १ वर्ष | ... | ८·०० टक्के |
| रु. १०,००० ते २५,००० पर्यंत | | ८·२५ टक्के |
| रु. २५,००० चे पुढे | ... | ८·५० टक्के |
| २ वर्षे | ... | ८·२५ टक्के |
| रु. १०,००० ते २५,००० पर्यंत | | ८·५० टक्के |
| रु. २५,००० चे पुढे | ... | ८·७५ टक्के |
| ३ वर्षे | ... | ८·५० टक्के |
| रु. १०,००० ते २५,००० पर्यंत | | ८·७५ टक्के |
| रु. २५,००० चे पुढे | ... | ९·०० टक्के |
| ४ वर्षे | ... | ८·७५ टक्के |
| ५ वर्षे | ... | ९·०० टक्के |
| (५) बचत निधी : ( ३ वर्षे मुदतीची ) | ... | ६·५० टक्के |

( जरूरीस्तव ठेव १ वर्षानंतर ४·५० टक्के व्याजासह परत करणेत येईल. )

| बा. भा. कबाडे | ग. गो. बर्गे | म. सा. कराळे |
|---|---|---|
| मॅनेजर | व्हा. चेअरमन | चेअरमन |

# सांगलीच्या सराफ गाडगीळ घराण्याची चिरंजीव उज्ज्वल परंपरा

## पुण्यातील पुरुषोत्तम नारायण आणि कंपनीचा शानदार लौकिक

दक्षिण महाराष्ट्रात सांगलीची व्यापारपेठ महत्त्वाची असून तिचा व्यापार महाराष्ट्राबाहेरीलही प्रमुख केंद्रांशी चालू असतो. सांगलीची सराफ पेठ सर्वत्र प्रसिद्ध आहे. ह्या पेठेमधील सर्वात जुनी पेढी म्हणजे गाडगीळांची.

### अल्प प्रमाणावर स्थापना

सुमारे १४० वर्षांपूर्वी नारायण वासुदेव गाडगीळ हे कोकणातून सांगलीस आले; शहरात जाऊन आपला जम बसविता आल्यास पाहावा, ह्या उद्देशाने. त्यांचे चिरंजीव गणेश नारायण गाडगीळ ह्यांनी या दुकानाची स्थापना मार्गशीर्ष शुद्ध ७ गुरुवार शके १७५४ ह्या दिवशी म्हणजे सन १८३२ मध्ये केली. प्रथम नारायण वासुदेव हे केवळ रस्त्यालगतच्या ओट्यावर बसून छोट्या प्रमाणावर धंदा करीत, गणेश नारायण ह्यांनी छोटेसे सराफीदुकान थाटले. सर्व जिन्नस सकाळी घेऊन दुकानात मांडावे व संध्याकाळी दुकान बंद झाल्यावर सर्व जिन्नस पुन: निरनिराळ्या पिशव्यात भरून पोत्यातून घरी न्यावे, असा तेव्हा क्रम होता. त्यानंतर नारायण गणेश व त्यांचे सुपुत्र पुरुषोत्तम नारायण (आबासाहेब), गणेश नारायण (दादासाहेब) आणि वासुदेव नारायण (बापूराव) ह्यांनी अत्यंत कर्तबगारीने, परिश्रमपूर्वक दुकानाची वाढ करून उज्ज्वल परंपरा निर्माण केली. पुढे भाऊराव ह्यांनी जव्हेरीच्या धंद्याची प्रगती केली.

### पुणे येथील पेढीचा प्रारंभ

आपल्या दुकानाची एखादी शाखा सांगलीबाहेर पुणे, मुंबई अगर नागपूर येथे काढावी असे बापूरावांच्या मनात फार होते. ह्या धंद्यात घरची माणसे असणे फार जरूरीचे असते पण घरची माणसे कमी होती, त्यामुळे हा बेत त्यांना रद्द करावा लागला. ही इच्छा तशीच राहून गेली. ती पुढे कार्यान्वित झाली. पुण्यास एक दुकान काढावे असे नव्या पिढीने ठरवून प्रयत्न सुरू केले त्यास त्यांचा आशीर्वाद मिळाला; त्यांना फार बरे वाटले आणि त्यांनी प्रोत्साहन दिले. नानासाहेब, दाजीसाहेब आणि विसुभाऊ ह्यांनी अनुक्रमे जडजवाहिर, सोने व चांदी या व्यवहारांची जबाबदारी पत्करली आणि माल तयार करण्यास प्रारंभ केला. नागोपंत चितळे ह्यांनी लिहिण्यासवरण्याची आणि आत्माराम पोतदार ह्यांनी कामगार विषयक तर गंगाराम गोवळकर ह्यांनी इतर कामाची जबाबदारी घेऊन मंडळी पुण्यात येऊन राहिली. कुंटे चौकात आबासाहेब टोकेकर जोशी ह्यांनी स्वत:च्या वाड्यात प्रशस्त जागा बांधून दिली आणि ९ फेब्रुवारी, १९५८ रोजी श्रीमंत राजेसाहेब सांगली ह्यांचे शुभ हस्ते "पुरुषोत्तम नारायण गाडगीळ आणि कंपनी" नावाची स्वतंत्र पेढी सुरू झाली. आता ह्या दुकानात नानासाहेबांचे चिरंजीव राजाभाऊ, दाजीसाहेबांचे चिरंजीव विद्याधर, हे सहाव्या पिढीचे प्रतिनिधी म्हणून काम पाहात आहेत. थोड्याच दिवसांत विसुभाऊंचे चिरंजीव अजित त्यांना येऊन मिळतील. पुण्यात गाडगिळांच्या दुकानाचे नाव सर्वतोमुखी झाले असून त्यांनी सचोटीने आणि विश्वासूपणामुळे पुण्यातील सराफी दुकानात अग्रस्थान मिळविले आहे. सांगलीच्या दुकानाची व्यवस्था पाचव्या पिढीचे प्रमुख आप्पासाहेब व हरिभाऊ प्रामुख्याने पाहात असत; आप्पासाहेब हे नुकतेच निवर्तले. आता त्यांचे चिरंजीव बापूराव, अरुण व प्रकाश, आणि हरिभाऊ व त्यांचे चिरंजीव सुधीर हे पाहातात.



पुरुषोत्तम नारायण ऊर्फ आबासाहेब गाडगीळ यांनी धंदा चिरंजीव केला.

### सांगलीच्या राजेसाहेबांनी केलेली प्रशंसा

पुण्यातील दुकानाचे उद्घाटनप्रसंगी, दि. ९-२-१९५८ रोजी, श्रीमंत राजेसाहेब सांगली यांनी केलेल्या भाषणाचा महत्त्वाचा भाग येथे देत आहोत. त्या वेळी ते म्हणाले, "सांगलीच्या गाडगीळ मंडळींनी पुणे येथे 'पुरुषोत्तम नारायण गाडगीळ आणि कंपनी' या नावाने सराफी व जव्हेरी दुकानाची स्थापना केली, त्याचे उद्घाटन करण्यास मला अतिशय आनंद होत आहे. सव्वाशे वर्षांपूर्वी गाडगीळ घराणे कोकणातून सांगलीस येऊन त्यांनी अगदी अल्प प्रमाणावर धंद्यास प्रारंभ केला. आपल्या हुशारीने, प्रामाणिकपणाने, प्रयत्नशीलतेने आणि चिकाटीने ते वैभवास चढले. गरीब-श्रीमंतांशी समान आत्मीय भाव, व्यापारातील सचोटी आणि मालातील निश्चयात्मक चोखपणा, हेच त्यांच्या

उज्ज्वल यशाचे मर्म आहे. गेल्या चार पिढ्या सांगली दरबारचे गाडगीळ हे अधिकृत सराफ आहेत.

"जुन्या पिढीतील के. आबासाहेब, के. दादासाहेब आणि श्री. बापूराव यांना सोने, चांदी, हिरे, मोती यांची पारख चांगली होती. आपल्या तरुण, उत्साही व कर्तबगार चिरंजीवांना आपले ज्ञान व अनुभव देऊन, योग्य वेळी स्वतः निवृत्त होऊन व त्यांच्यावर धंदा सोपवून तो त्यांनी चिरंजीव करून टाकला आहे. कोणत्याही धंद्यात पैशाइतकेच महत्त्वाचे भांडवल प्रामाणिकपणा हे असते, व ते गाडगीळ मंडळीचे रोमारोमात भिनले आहे. त्यांना मी सुयश चिंतितो."

सांगली प्रमाणेच दक्षिण महाराष्ट्रातील इतर संस्थानिकांनी व नागरिकांनीही गाडगीळ पेढीस प्रोत्साहन देऊन गौरविले आहे.

### कामगारांची सचोटी

सराफीसारख्या धंद्यात घरची माणसे जेवढी जास्त तेवढी चांगली, कारण त्यामुळे सचोटी सांभाळता येते. ह्या धंद्यातील नोकरही तसेच असावे लागतात.

ही सचोटी कशामुळे शक्य झाली आहे? गाडगीळांच्या दुकानाचे भागीदार जसे परंपरेने आलेले आहेत तसेच त्यांचे कामगारही ह्या पेढीत पिढ्यान् पिढ्या काम करीत आहेत आणि दुकानाच्या लौकिकाबद्दल त्यांना मालकाइतकीच आत्मीयता व आस्था आहे. कामगारांच्या सचोटीचे हे रहस्य विशेष उल्लेखनीय आहे.

### पगारी माणूस पण पेढीचा पालक

के. पुरुषोत्तम नारायण गाडगीळ आणि त्यांचे दोघे धाकटे भाऊ के. दादा व के. काका ह्यांच्या लहानपणीच त्यांची आई निवर्तली. त्यांचे वडील के. नारायण गणेश गाडगीळ (बाळनाना) पत्नीच्या विरहानंतर भ्रतस्थ ऋषीसारखे राहू लागले. त्यांच्या दूरच्या नात्याचे एक गृहस्थ भालूकाका हे दुकानाचा व घरचा व्यवहार संभाळून सर्वांची काळजी घेत. त्यांचा शब्द सर्वजण मानीत असत. प्लेगच्या साथीत गावातील सर्व माणसे बाहेर झोपड्या बांधून राहात; गाव निर्मनुष्य होई. अशा वेळी भालूकाकांनी सर्व मुलांची मळ्यात राहाण्याची सोय केली. ते स्वतः रात्री एकटेच गावातल्या घरी खजिन्याच्या खोलीच्या उंबरठ्यावर झोपत असत. त्यांचा पगार वाढविण्याचे बाळनानांनी ठरविले तेव्हा ते म्हणाले, "आपली मुले अजून लहान आहेत. ती मोठी होऊन कारभार नीट पाहू लागू देत. तोपर्यंत आपल्याला पगारवाढ करणं परवडणार नाही."

### शिदू मज्याचा विक्रम

त्याच वेळी शिदू नावाचा एक उंच, धिप्पाड गडी होता. तो सांगलीहून मुंबईस रोकड सुरती रुपये कमरेस बांधून घेऊन चालत जाई आणि मुंबईतल्या एका पेढीतून सोनेचांदी खरेदी करून सांगलीस येई. अशा त्याच्या खेपा सतत चालत. (त्या काळी चलनी नोटा नव्हत्या; आगगाडी-मोटारची वाहतूकही नव्हती) एकदा त्याला अष्टे-इस्लामपूर नजीकच्या टप्प्यात दरोडेखोरांनी गाठले, तेव्हा त्याने भिकाऱ्याचे सोंग घेऊन त्यांचेकडून भाकरीतुकडा मागितला, त्यांच्याबरोबर एक-दोन मुक्काम राहिला आणि संधी मिळताच निसटून आपल्या वाटेने गेला.

पुढील काळात बळवंतराव दीक्षित, बाबा बोडस, विश्वनाथराव सहस्रबुद्धे, भास्करराव पोंक्षे, नागोपंत चितळे, इत्यादींनी कर्तव्यदक्षतेने आणि प्रामाणिकपणे कामे केली. त्यामुळे पेढीचा लौकिक सगळीकडे आणखी पसरला.

### पेढीची पोलिटिकल एजंटकडून चाचणी

हा लौकिक काशीपासून रामेश्वरपर्यंत पसरला. त्या काळी बँका नव्हत्या; हुंडींचा व्यवहार चाले. गाडगिळांची हुंडी सर्व ठिकाणी चाले एकदा दक्षिण महाराष्ट्राच्या पोलिटिकल एजंटने त्या वेळच्या सांगलीच्या अधिपतींना विचारले, "तुमच्या संस्थानात मातब्बर असामी कोण आहेत?" राजेसाहेबांनी गाडगिळांच्या पेढीचे नाव तात्काळ सांगितले. पोलिटिकल एजंटनी लगेच त्या पेढीवर एक लक्ष रुपयांची हुंडी केली व त्यांचे हाती दिली हुंडी पेढीवर जाताच वटवण्याची व्यवस्था झाली. गाडगीळ मागतील ती रक्कम द्यावी अशी राजेसाहेबांनी ट्रेझरीस सूचना देऊन ठेवली होती पण तिचा उपयोग करण्याची पाळी आलीच नाही.

### सांगली बँक स्थापली आणि तिच्या अडचणीच्या वेळी वाचविली

सांगली बँकेची सुरुवात पुरुषोत्तम नारायण गाडगीळ ह्यांचे हस्ते झाली. पुढे त्या बँकेस काही व्यवहारात मोठी ठोकर लागली आणि ठेवीदार ठेवी परत घेण्यासाठी बँकेत गर्दी करू लागले. बँकेचे मॅनेजर शिवरामपंत म्हैसकर घाबरून गेले. त्यांनी आबांचेकडे हकीकत कळविली. आबांनी ताबडतोब एक खटारा गाडी बोलावली आणि त्यात दुकानातील सुरती रुपयांच्या थैल्या रचून ती गाडी बँकेकडे आपले पुतणे लक्ष्मणराव गाडगीळ ह्यांचे बरोबर पाठविली. 'जे कुणी पैसे मागतील त्यांना देऊन टाका' असा त्यांनी मॅनेजरला निरोप धाडला; त्याचप्रमाणे राजेसाहेबांना तार करून लागेल ती रक्कम ट्रेझरीमधून मिळविण्याची व्यवस्था करून घेतली.

### महापुराचे वेळी गोरगरिबांना आधार

१९१४ साली सांगलीमध्ये महापुरामुळे हाहाःकार उडाला. सर्व गावात पाणीच पाणी झाले. गोरगरिबांना आसऱ्यासाठी दोनच जागा होत्या. सरकारी वाडा आणि गाडगिळांचा वाडा. त्यांच्या राहाण्याची आणि खाण्यापिण्याची व्यवस्था तिकडे राजेसाहेब आणि इकडे गाडगीळ स्वखर्चाने पाहात. त्यांच्या चीजवस्तू फडक्यात बांधून, त्यावर नावे व तारखा घालून गाडगीळ ठेवीत; ते सर्व आपल्या सवडीने आपली गाठोडी घेऊन जात. गाडगीळ घराण्याने शैक्षणिक व लोकोपयोगी कार्यास सढळ हाताने मदत केलेली आहे.

### गिऱ्हाइकांचा विश्वास

"तुम्ही पुणे जिंकले" असे कोणी गाडगीळ सराफांना सांगितली तर त्यास गाडगीळ उत्तर देतात, "आम्ही पुणे जिंकले आहे नसून पुणेकरांनी आम्हाला जिंकले आहे आणि ते आमच्याकडून सेवा करून घेत आहेत. त्यात आम्हाला अभिमानच वाटतो." पुण्यास दुकान काढण्यापूर्वी कित्येकांनी गाडगीळांना पुण्यातील गिऱ्हाइकांबद्दल बरेच काही सांगून येथे येण्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला होता, ह्या पार्श्वभूमीवर गाडगीळांना विशेषच समाधान वाटत आहे. धर्मकाट्यावर सोनेचांदी वजन करून देण्याघेण्याची पुण्यातील सराफबाजारातील प्रथा आहे. परंतु गाडगिळांच्या दुकानातील काट्यावरील वजन धर्मकाट्यावरील वजनाइतकेच विश्वासार्ह गिऱ्हाइके मानतात, ह्यापेक्षा प्रमाणिकपणाचा आणखी पुरावा काय हवा!

### शानदार लौकिक

गाडगीळांचे दुकान पुण्यात स्थापन झाल्यानंतर दाजीसाहेबांनी आपल्या मनमिळाऊ स्वभावाने आणि चिकाटीने गिऱ्हाईक आपलेसे केले, आणि नानासाहेबांची पुणे सराफ असोसिएशनच्या अध्यक्षपदी एकमताने निवड झाली, ह्यावरून गाडगीळांच्या पेढीचा मोठा वारसा, पुण्यातील दुकानाने अल्पावधीत मिळविलेला लौकिक आणि सराफ पेठेतील आदराचे स्थान, ह्याची कल्पना येईल. नानासाहेब स्वतः जवाहर-तज्ज्ञ म्हणून पश्चिम भारतात सुप्रसिद्ध आहेत. ह्या व्यवसायाचा आणखी व्यापक अनुभव मिळविण्यासाठी काही वर्षांपूर्वी ते जपान आणि युरोपातील देशात दीर्घ काळ राहून आले आहेत. एका पांढरपेशा घराण्यातील सहा-सात पिढ्यांनी सराफीच्या आणि जवाहिराच्या पेढीचा लौकिक वाढवत नेऊन जी समाजाची सेवा चालविली आहे ती प्रशंसनीय आणि अनुकरणीय आहे.

### १९७२–७३ मध्ये सरकारी क्षेत्रातील कारखान्यांना १७·७४ कोटी रु. नफा

सरकारी क्षेत्रातील कारखान्यांनी १९७२–७३ मध्ये एकूण १७·७४ कोटी रु. चा नफा कमविला. १९७१–७२ मध्ये त्यांना १९·१५ कोटी रु. चा तोटा झाला होता. १९७२–७३ मध्ये चालू असलेल्या १०१ कारखान्यांपैकी ६७ कारखान्यांना एकूण १०४·४६ कोटी रु. चा नफा झाला, तर बाकीच्या ३४ कारखान्यांना ८६·७२ कोटी रु. तोटा झाला.

सन १९७२–७३ मध्ये कारखान्यांनी ७४ कोटी रु. किमतीचे परकीय चलन मिळविले. ह्या आधीच्या वर्षी ही रक्कम ६६ कोटी रु. होती.

दि. ३१ मार्च १९७३ रोजी सरकारी क्षेत्रातील कारखान्यांमध्ये एकूण गुंतवणूक ५,५७१ कोटी रु. ची होती असे या अहवालावरून दिसते. त्यात केन्द्र सरकारचे ५,०६७ कोटी रु. होते. उत्पादन कारखान्यांत ४,५५९·८८ कोटी रु., सेवा उपलब्ध करून देणाऱ्या कंपन्यांत ८६६.४७ कोटी रु, विमा महामंडळात ३१·५ कोटी रु. व उभारणी होत असलेल्या कारखान्यांत ११२·८५ कोटी रु. गुंतवणूक करण्यात आलेली होती.

सरकारी क्षेत्रातील कारखान्यांमध्ये इंडियन ऑईल कॉर्पोरेशनला सर्वात जास्त नफा (२२·१७ कोटी रु.) झाला. त्यानंतर भारतीय नौका महामंडळ ८·०८ कोटी रु., भारत हेवी इलेक्ट्रिकल्स ७·४ कोटी रु. असा क्रम लागतो.

पाच कोटी रु. व त्यापेक्षा अधिक तोटा होणाऱ्या कारखान्यांत हिंदुस्थान स्टील लि. (२७·८० कोटी रु.), हेवी इंजिनियरिंग कॉर्पोरेशन (१६·५७ कोटी रु.), नेव्हेली लिग्नाईट कॉर्पोरेशन (९·९५ कोटी रु.), बोकारो स्टील (५·४५ कोटी रु.) यांचा समावेश आहे.

**सिनेमा नट-नटींचा इन्कमटॅक्स**—सिनेमा नट-नटींच्या इन्कम टॅक्सच्या हिशेबातील उत्पन्नाची बेरीज एक लक्ष रुपयांनी नेमकी कमी होते, अशी चूक वारंवार आढळून आली आहे. उदाहरणार्थ, एका नटाच्या उत्पन्नाची बेरीज २,५६,२६४ रु. ऐवजी १,५६,२६४ रु. करण्यात आली. अशा चुकांमुळे इन्कम टॅक्स खात्याचा दुर्लौकिक होतो अशी ताकीद पार्लमेंटच्या पब्लिक अकौंटस कमिटीने दिली आहे.

**अशुद्ध रक्ताबद्दल इशारा**—कित्येक इस्पितळांतून रुग्णांच्या शरीरात घालण्यात येणारे रक्त अशुद्ध असते आणि त्यामुळे रोग होण्याचा संभव असतो, असा इशारा इंडियन रेड क्रॉस सोसायटीने जनतेला दिला आहे. स्वतःचे रक्त देण्याचा धंदा करणाऱ्या लोकांचे रक्त दूषित असले तरी ते दिले आणि स्वीकारले जाते, कारण ते नीट तपासून घेतले जात नाही. त्यामुळे हा धोका निर्माण होतो.

**पोस्टकार्ड पोचते करण्यास १७·६७ पैसे खर्च**—पोस्टात टाकलेले पोस्टकार्ड लिहिलेल्या पत्त्यावर पोचते करण्यास १७·६७ पैसे खर्च येतो. (त्यात कार्डाचा कागद आणि छपाई ह्यास लागणारा १ पैसा समाविष्ट आहे.) पोस्टकार्डाचा दर १० पैशांचा १५ पैसे केल्यामुळे दरसाल ४·९३ कोटी रु. अधिक उत्पन्न होईल आणि त्यामुळे नुकसानीची रक्कम ७·५६ कोटी रु. वरून २·६३ कोटी रु. वर येईल.

**मेट्रिक कॅलेंडर**—हिंदी वायुदलातील सिग्नल विभागातील एका अधिकाऱ्याने १० दिवसांचा आठवडा आणि १० आठवड्यांचे वर्ष, असे कॅलेंडर सुचविले आहे. ह्यासंबंधी त्याने वैयक्तिक जबाबदारीवर आंतरराष्ट्रीय संघटनाशी पत्रव्यवहार चालविला आहे.

**गुजरातमध्ये सायकल रिक्शा पुनः कायदेशीर**—१९४८ सालापासून माणुसकीच्या दृष्टीने बेकायदा असलेल्या सायकल रिक्शांना लायसेन्स देण्याचे ठरविण्यात आले आहे.

## सांगली अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि.

मुख्य कार्यालय :

हरभट रोड, सांगली

( स्थापना ९३५ )

समाजातील सर्व थरातील घटकांना त्यांचे जीवनमान सुधारण्याकरिता, व्यवसायाच्या वाढीकरिता व घरगुती अडचणी प्रसंगी हमखास आपल्या उपयोगी पडणारी ..

महाराष्ट्र राज्यातील नागरी बँकांतील अग्रणी बँक

शाखाविस्तार :

गावभाग (सांगली), खणभाग (सांगली), मार्केटयार्ड (सांगली)
माधवनगर, बुधगांव, विश्रामबाग
कसबे डिग्रज मिलवडी, म्हैसाळ आणि

मराठवाड्यातील बीड व परभणी या जिल्ह्यांचे ठिकाणी

आकर्षक व्याजाने ठेवी स्वीकारल्या जातात.
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

सर्वांना उपयोगी पडतील अशा योजना चालू आहेत

मा. न. कालेकर. (वकील) — कार्याध्यक्ष.
ल य लागू — व्यवस्थापक.

## दि मिरज स्टेट बँक लिमिटेड

( शेड्यूल्ड बँक )

स्थापना – १९२९

* शेती, लघुउद्योग व व्यापार यांच्या अभिवृद्धीसाठी जनतेच्या सेवेत गेली ४४ वर्षे.
* सर्व प्रकारची बँकिंग सेवा उपलब्ध.
* आकर्षक व्याजदराने आम्ही ठेवी स्वीकारतो.
* आमच्या शाखा—सांगली, मार्केटयार्ड सांगली, कुर्डुवाडी, पंढरपूर, बार्शी, करमाळा, सांगोला, माढा ( जि. सोलापूर ), लक्ष्मेश्वर ( जि. धारवाड ).

नजीकच्या शाखाधिकाऱ्याशी संपर्क साधा.

डी. ए. दिवाण
चेअरमन

फोन नं. २१९१ व २१९२ — तार : जनता बँक

## इचलकरंजी जनता सहकारी बँक लि., इचलकरंजी

( स्थापना : ७ फेब्रुवारी, १९६३ )

शाखा : ( १ ) कोल्हापूर ( २ ) शिरोळ ( ३ ) जयसिंगपूर

केवळ अकरा वर्षांच्या वाटचालीतील नेत्रदीपक प्रगती

– सेवा हेच आमचे ब्रीद –

( आकर्षक व्याजाच्या दराने ठेवी स्वीकारल्या जातात. )

– लघुउद्योगधंद्यांना भांडवलपुरवठा करणे हेच आमचे ध्येय –

( १ ) खपलेले भाग-भांडवल .... रु. सात लाख.
( २ ) गंगाजळी व इतर निधी .... रु. सहा लाख अडुसष्ट हजारांवर.
( ३ ) ठेवी .... रु. एक कोटी पन्नास लाखांवर.
( ४ ) खेळते भांडवल .... रु. दोन कोटींवर.

आर. पी. कुलकर्णी — मॅनेजर
एस. आर. हुपरे — व्हा. चेअरमन
के. वि. आवाडे — चेअरमन

# आपली वजने, मापे किती अचूक आहेत बरे ?

## गिऱ्हाइकांची प्रचंड प्रमाणावर फसवणूक

(डॉ. मो. वा. चिपळूणकर)

दशमान पद्धतीच्या नाण्याबरोबरच मेट्रिक पद्धतीची वजने, मापे इ. स. १९६० साली या देशात आणून पूर्वापार रूढ असलेल्या पण वेगवेगळ्या आणि गुंतागुंतीच्या पद्धती काढून टाकल्या एवढेच नव्हे तर अनेक प्रकारच्या देवघेवीतील आडनेडी आकडेमोडींनी निर्मिलेल्या गोंधळाच्या विचित्र अवस्था संपूर्णपणे निपटून टाकिल्या आहेत. फ्रान्स, बेल्जिअम, स्वित्झर्लंड, इटली, स्पेन, पोर्तुगाल, जर्मनी, हॉलंड, स्वीडन आणि नॉर्वे या सर्व देशांत मेट्रिक पद्धती म्हणजे अंतरे, वजने आणि मापे यांच्या दशमान पद्धतीच्या श्रेणीतील प्रमाणे सरसकट रोजच्या वापरात आहेत. तिच्या दशमान गणन स्वरूपासाठीच केवळ ही मेट्रिक पद्धती सर्व वैज्ञानिक, व्यापारी, आणि कारखानदार वापरतात. पण भारतातील लक्षावधी अशिक्षित जनतेला हा बदल काही सहजासहजी आत्मसात करता आला नाही व साहजिकच हा अवघड प्रश्न सोडविण्यास आपल्याला अनेक वर्षे खर्च करावी लागली आहेत; तरीसुद्धा आजही खेड्यापाड्यांतून जुनीच वजने, मापे वापरून, व तसे करणे कायद्याच्या विरुद्ध असूनसुद्धा, छोटे-मोठे व्यवहार सर्रास केले जात आहेत. याहून अधिक म्हणजे आपण शहरवासी निःशंक आणि भोळे भारतीय गिऱ्हाईक आपल्याच देशांतील निर्लज्ज व्यापाऱ्यांकडून आज अनेक वर्षे अक्षरशः लुटले जात आहो. अमाप फायद्यासाठी केवळ सदोष आणि खोटी वजने, मापे वापरून गरीब बिचाऱ्या बायाबापड्यांना हेरून सर्रास फसविले जात आहे.

केंद्रीय व्यापार मंत्रालयाने केंद्रीय कायदा मंत्रालयातील उपसचिव श्रीयुत एस्. के. मैत्र यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या वेट्स अँड मेझर्स (लॉ डिव्हिजन) कमिटीच्या "मैत्र समिती"च्या अहवालात नव्याने उघडकीस आणलेल्या अनेक प्रकारच्या चित्तवेधक माहितीमुळे तरी आता आपली ही निःशंक व भोळी वृत्ती घालविली जाईल अशी आशा वाटते.

ज्यावेळी या मैत्र समितीने देशांतील अनेक ठिकाणची अगदी पूर्वग्रहरहित पद्धतीने गोळा केलेली रोजच्या वापरातील असंख्य वजनेमापे तपासली तेव्हा तिला असे आढळून आले की यदृच्छयाच हाती आलेल्या नगांपैकी ६०% नग अदमासे ५% पासून २०% पर्यंतच्या फरकाने सदोष होते! अशी खोटी अप्रमाणित वजने अर्थात् धूर्त व्यापाऱ्यांनीच बनवून कमी किंमतीला विकली होती. "व्यापारासाठी नव्हे" असे मात्र त्यावर स्पष्ट कोरलेले होते! यासंबंधी अस्तित्वात असलेला कायदा डावलण्यासाठी आणि कोणत्याही संभाव्य शिक्षेतून सहीसलामत निसटून जाण्यासाठी त्यांनी निर्मिलेली ही युक्ती होय, यात बिलकूल संशय नाही. यासंबंधीचा आजचा कायदा फक्त "व्यापारी देवघेवीत" वापरल्या जाणाऱ्या वजनांनाच लागू आहे; अशामुळे ते उजळ माथ्याने बाजारात वावरू शकतात. कायद्याच्या विस्तृत गवसणीतून निसटण्याची हीच युक्ती खरोखरी पुष्कळ अंशांनी आज व्यवहारात सर्रास चालू असलेल्या खोट्या व सदोष वजनांना जन्म देण्यास कारणीभूत झालेली आहे.

फुटकळ देवघेवीतील आणि घाऊक व्यापारांतील देवाणघेवाणीत वजनामापातील अशी खोटीकिरी अवघी पाच टक्क्यांची मानली तरी आपले भारतीय गिऱ्हाईक दर वर्षाला किमानपक्षी ११,००० कोटी रुपयांचा तोटा सोसत आहे असे दिसून येईल! ह्या निर्दय चोरट्या घसाऱ्यामुळे सर्वसाधारण माणसाची क्रयशक्ती कमी होते, असे या तऱ्हेच्या नाट्यपूर्ण आकडेवारींनी उघडकीस आणून समाजाला या परिस्थितीचे महत्त्व पटविले जात आहे. गिऱ्हाइकाला भरमसाट किंमतीला तर ठकविले जात आहेच पण शिवाय मालाचा ऐवज आणि दर्जा या दोन्ही बाबतींतही त्याला त्याच्या पैशाचा योग्य मोबदला मिळत नाही.

मालाच्या बरोबरच त्याच्या आवरणाचेही वजन करणे व किंमत आकारताना त्याबद्दल मुळीच निराळा विचार न करणे हा आणखी एक प्रकारचा खोटा व्यवहार या देशात सर्रास केला जात आहे. कधी कधी तर ही गोष्ट धडधडीत गिऱ्हाईकाच्या समोर निर्लज्जपणाने केली जाते. व्यापार-मंत्रालयाच्या पाहणीत असे आढळून आले आहे की इ. स. १९७२ साली दिवाळीतील मिठाई ज्यांनी खरेदी केली त्यांनी दर किलोग्रॅम मागे १ रुपया ६० पैसे एवढा तोटा सहन केला. हे नमूद करून व्यापाऱ्यांच्या या निर्लज्ज व्यवहारकुशलते (?) कडे आपले लक्ष या समितीने वेळीच वेधले आहे. याचे कारण असे दिले आहे की गिऱ्हाइकाला मिठाई विकताना वापरलेल्या पुठ्ठ्याच्या पेटीचे वजनच मुळी दिलेल्या मिठाईच्या वजनाच्या दहा टक्क्याहून कमी नव्हते. काही दुकानदारांनी तर अशा मार्गांनी दर वर्षाला रु ८६,००० पर्यंत जादा फायदा उपटला आहे!

आपल्या कोळशाच्या खाणीतील मजुरांना व त्याचप्रमाणे सर्व देशभरच्या असंख्य मळ्यातील मजुरांना देण्यात येणारा मेहनताना त्यांनी प्रत्येक दिवसात जमविलेल्या मालाच्या "वजना" वर किंवा "व्यापा" वर आधारलेला असतो. यामध्ये केवळ एक टक्का चुकीच्या वजनामापामुळे त्यांच्या एकंदर मिळकतीतील शेकडो कोटी रुपयांचा तोटा त्यांना सोसावा लागतो! त्याचबरोबर, असल्या मालावरील जकात आणि सरकारी करांच्या पोटी आपल्या अर्थखात्यांना दरवर्षी तीस कोटी रुपयांचा फटका बसतो.

खेड्यापाड्यातील व्यापारउदीम व उद्योगधंदे यांवर होणाऱ्या अनिष्ट परिणामाखेरीज, आपल्या शाळा-कॉलेजातील शिक्षणात प्रमुख गणलेल्या प्रायोगिक विज्ञानाच्या शिक्षणावर या खोट्या

व सदोष वजनांमुळे मोठीच आपत्ती ओढविली आहे. त्यांच्या वापरामुळे अनेक प्रयोगशाळांतील, संशोधनसंस्थांतील आणि विद्यापीठांतील कामावर सरळसरळच अनिष्ट परिणाम होत असल्याकारणाने देशाच्या वैज्ञानिक आणि तांत्रिक प्रगतीवर घाला घातला जात आहे. विद्यार्थी वापरीत असलेली पाचशे मिलिग्रॅम पर्यंतची लहान लहान वजनं बहुधा सदोषच असतात असे नव्या दिल्लीच्या राष्ट्रीय पदार्थ वैज्ञानिक प्रयोगशाळेने केलेल्या परिक्षणात आढळून आले आहे.

वजना-मापांच्या अनियंत्रित निर्मितीमुळे व त्याच्या बेदरकार वापरामुळे व्यापारी जगतातील समाजविरोधी घटकांचे खूपच फावले आहे. एकंदर समाजाच्या दृष्टीने वजन-मापांच्या प्रमाणीकरणाच्या आवश्यकतेची निकड अशा तऱ्हेने सिद्ध होत आहे. तत्त्वतः आपल्या संपूर्ण देशात वजनमापांची सरसकट एकच पद्धती, प्रथम म्हटल्याप्रमाणे, अस्तित्वात आणली आहे. तथापि अनेक वर्षांच्या प्रयत्नांनंतरही त्यामध्ये प्रत्यक्ष व्यवहारांच्या दृष्टीने आवश्यक असलेले प्रमाणीकरण आपल्याला करता आलेले नाही, ही फार खेदाची गोष्ट होय. अप्रमाणित वजनमापे बनविण्यासंबंधीच्या योग्य कायद्याच्या अभावी अशा खोट्या व लबाडीच्या व्यापाराला उत्तेजनच मिळते. "व्यापारासाठी योग्य" आणि "व्यापारासाठी अयोग्य" असा वजन-मापात भेद मान्य करणे हेच चूक होय; व तो फरक एकदम काढून टाकणे हा या आपत्तीवरील एकच तर्कशुद्ध उपाय होय.

सगळ्या पाहता मध्यवर्ती आणि राज्य अशी दोन्ही प्रशासने खोट्या वजनामापांच्या वापरावर नियंत्रण घालण्यास संपूर्णतः अपयशी ठरली आहेत; असल्या समाजविरोधी कारवायांना पायबंद घालण्यास आधीच अपुऱ्या असलेल्या आजच्या कायद्यांची अमलबजावणी करण्यासही ती अपात्र ठरली आहेत; आणि म्हणूनच त्यांना एकंदर गिऱ्हाइकांचे हित योग्य प्रकारे सांभाळता आलेले नाही. इ. स १९५६ च्या कायद्यात संपूर्ण सुधारणा करण्याची गरज आहे; व जे लोक वजनमापात फसवणूक करतील त्यांना अधिक जबर शिक्षा देणे, व शिक्षणासाठी पुरविण्यात येणाऱ्या वजनांची फेरतपासणी करणे आवश्यक झाले आहे.

गिऱ्हाइकांची फसवणूक करण्याच्या हेतूने असे गुन्हे करणारांच्या विरुद्ध न्यायालयात फिर्याद दाखल करण्याची तरतूद करावी असे वजने-मापे विषयक कायद्याच्या दुरुस्तीसाठी नेमलेल्या कमिटीच्या अहवालात बरोबर सुचविले आहे.

सध्या "सामाजिक इजा" केल्याबद्दल कोणाही व्यक्तीला अशी फिर्याद दाखल करता येते. पण कमिटीने केलेल्या नव्या सूचनेनुसार "सामाजिक इजा" याचा अर्थ अधिक व्यापक करून गिऱ्हाइकांच्या एखाद्या संघालासुद्धा याविरुद्ध कायदेशीर इलाज व्हावा म्हणून मागणी करता येईल.

---




प्रथम पासूनच किर्लोस्कर एंजिने त्यांच्या उत्तम दर्जाबद्दल प्रसिद्ध आहेत.
देशातील आणि परदेशातील असंख्य शेतकरी व इतर ग्राहक यांच्याकडे वापरात असलेली एंजिने हे याचे प्रतीक आहे.

आतां भारतीय मानक संस्थेने (ISI) देखील प्रमाणपत्र देऊन, हे मान्य केले आहे.

किर्लोस्कर ®

किर्लोस्कर एंजिन- शेतकऱ्याची पहिली पसंती

किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लि.
१३, लक्ष्मणराव किर्लोस्कर रोड, खडकी, पुणे ३

® एंजिनसाठी किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लिमिटेड यांनी या ट्रेडमार्कच्या उपयोगाचा अधिकार नोंदविलेला आहे.

Tom & Bay, KO-7315-M

# अधिकारीवर्ग–कंपन्यांची जिवंत मालमत्ता

## ताळेबंदात दिसत नाही पण नफा वाढविते.

( सु. वि. मेहेंदळे, बी. ई., एम्. बी. ए. )

आजच्या आधुनिक औद्योगिक जगतात एखाद्या कंपनीचा दर्जा निव्वळ त्या कंपनीच्या दरवर्षी प्रसिद्ध होणाऱ्या ताळेबंदावरून किंवा नफातोटा पत्रकावरून ठरवता येणार नाही. नुसता जास्त नफा कमावणारी किंवा वाढीव विक्री करून दाखवणारी कंपनी ही आदर्श मानली जाणार नाही. तसेच जर काही विशिष्ट पद्धती किंवा सुधारणा अमलात आणल्या गेल्या नाहीत तर अशी कंपनी फार काळ आपली विक्री किंवा नफा यांतील वाढही टिकवून धरू शकणार नाही व त्या कंपनीची थोड्याच वर्षात अधोगती झालेली आढळून येईल. कंपनीची समाजात व औद्योगिक जगतात प्रतिष्ठा राखण्यासाठी तसेच वाढवण्यासाठी जागृत व्यवस्थापनाकडून हेतुपूर्वक प्रयत्न केले जातात. हे प्रयत्न कोणत्या प्रकारचे असावेत यासंबंधी थोडे मार्गदर्शन प्रस्तुत लेखात केले आहे. सर्वप्रथम कंपनीच्या पॉलीसीज ठरवणाऱ्या वरिष्ठांतर्फेच त्यांच्या कंपनीचे आत्मपरीक्षण करवून घ्यावयास लागेल. पुढील प्रश्नांची वस्तुनिष्ठ उत्तरे त्यांनी मिळवून घ्यावी :–

१. कंपनीच्या गिऱ्हाइकांचे तसेच नोकरवर्गाचे कंपनीबद्दल अनुकूल मत आहे का ? नसल्यास या मंडळींच्या प्रमुख तक्रारी कोणत्या आहेत ?

२. कंपनीला माल व सेवा पुरविणाऱ्या व्यापाऱ्यांना न्याय्य वागवणूक मिळते का ? त्यांच्याशी होणारे व्यवहार रास्त मार्गांनी होतात का ?

३. कंपनीच्या व्यवस्थापनाच्या पद्धती अजूनही पुराण्या आहेत का ? कंपनीचे निरनिराळे विभाग पद्धतशीरपणे चालवले जातात का ? व्यवस्थापनाचे त्या विभागावर पुरेसे नियंत्रण आहे का ?

कोणत्याही कंपनीत नोकरी स्वीकारताना, त्या कंपनीचे रोखे खरेदी करताना, त्या कंपनीशी सप्लायर किंवा गिऱ्हाईक म्हणून काम करताना, वरील प्रश्नांची उत्तरे संबंधितांना हवी असतात. त्या उत्तरांवरून ही कंपनी स्थिर आहे का ? तिची प्रगती होणार आहे का ? वगैरेंविषयी अंदाज बांधले जातात. ज्या कंपन्यांविषयी संशय वाटेल अशा ठिकाणी मोठा पगार मिळत असूनही नोकरी करण्यास लोक तयार होत नाहीत. त्या कंपन्यांना माल पुरविण्यापूर्वी पैसेवसुलीच्या कडक अटी व्यापारी घालतात. गिऱ्हाइके माल दहा वेळा तपासून घेतात. अशा परिस्थितीत त्या कंपनीची प्रगती होणे कसे शक्य आहे ?

कोणत्याही कंपनीची प्रतिष्ठा तपासण्याची एक रीत म्हणजे त्याच कंपनीच्या अधिकारीवर्गाशी चर्चा करून आडाखे बांधणे. हा अधिकारीवर्ग जरी उघडउघड कंपनीसंबंधी बोलत नसला तरी त्यांची काम हाताळण्याची पद्धती, अडचणीच्या प्रसंगी उत्तरे देण्याची भाषा, यावरून योग्य ते निष्कर्ष काढता येतील. येथे काही कंपन्यातील उदाहरणे दिली आहेत व त्या तऱ्हेची वाक्ये जर तेथील अधिकारी सारखे वापरत असतील तर त्यावरून निघणारे निष्कर्ष काय असू शकतील याचेही विवेचन दिले आहे. ही उदाहरणे अमेरिकेसारख्या प्रगत देशातील आहेत पण आपणास ती आपल्या येथील कंपन्यांतही प्रचारात आढळतील.

● "कंपनी त्यांची आहे. ते त्यांना पटेल तसा कारभार चालवतात. मी काय करणार ?"

लिमिटेड कंपन्या होऊनही अजूनही हुकूमशाही पद्धतीने अनेक ठिकाणी कारभार चालत असतो. अशा वातावरणात अधिकारीवर्ग स्वयंस्फूर्तीने विशेष लक्ष घालून व पुढाकार घेऊन कामे उरकत नाहीत. साधेसाधे निर्णय वरिष्ठांच्या संमतीसाठी खोळंबून राहतात व महत्त्वाचा वेळ वाया जातो. आजच्या औद्योगिक स्पर्धेत विविध अनुभवांचे व कौशल्यांचे नेतृत्व आवश्यक असते व कोणत्याही एका माणसाजवळ एवढा अनुभव व कुशलता असण्याची शक्यता कमी आहे. जर वरिष्ठ चुकले तर कंपनीला त्याचे परिणाम भोगावे लागतात. कारण इतर लोक ती चूक सुधारण्याच्या योग्यतेला पोचलेले नसतात व त्यांना अधिकार नसल्याने तेही व्यवस्थाप्रमाणे नुकसान कसे होत आहे पाहात बसतात.

● "ते माझे काम नव्हे ! मी मला प्रत्यक्ष सांगितलेलेच काम पाहीन."

कंपनीचा अधिकारीवर्गसुद्धा जर सारखी अशी भाषा वापरून बरीचशी कामे टाळू लागला किंवा दुसऱ्यावर ढकलू लागला तर कनिष्ठ कर्मचारीवर्गही ह्याच प्रवृत्तीने वागू लागेल. कोणतेही काम उरकण्यास जरूरीपेक्षा अधिक नोकरवर्ग नेमावा लागेल. उदाहरणार्थ, ज्याने त्याने आपली कामाची जागा स्वतःहून स्वच्छ ठेवली व केरकचरा ठराविक ठिकाणी जमा केला तर कंपनीला साफसफाईसाठी किती तरी कमी कामगार लागतील. आजच्या वाढत्या महागाईत साधे झाडू कामगारही खर्चाच्या दृष्टीने अनेक कंपन्यांना परवडत नाहीत.

● "आमच्या कंपनीत ही सुधारणा टिकणार नाही, चालणार नाही."

बऱ्याचशा कंपन्यांत असे निराशावादी अधिकारी असतात. अनेक वर्षे एकाच खात्यात, एकाच ठिकाणी काम करून त्यांच्या एकंदर अनुभवावरूनही हे लोक या स्वभावाचे बनलेले असतात. त्या उद्योगात नावीन्याचे संशोधन आणि उद्योगयोजकता यांचीच धंद्याच्या वाढीसाठी आवश्यकता आहे तेथे जर व्यवस्थापकच असे निराशेचे सूर काढू लागले तर कधीच सुधारणा होणार नाही व प्रगती खुंटेल. नोकरवर्गास नवीन उपक्रम हाती घेण्यास उत्तेजन द्यायचे असेल तर अधिकारीवर्ग आशावादी आणि उत्साहीच असायला हवा.

● “ ते मला माहीत नाही. ही चूक आमची नव्हे ! ”

कोणताही निर्णय घेण्यात चूक झाली तर अधिकाऱ्यांनी ती चूक कबूल केली पाहिजे. त्याऐवजी जर एखादा अधिकारी त्या चुकीचे समर्थन करू लागला व दोषाचे खापर दुसऱ्या खात्यावर किंवा कनिष्ठ माणसावर फोडू लागला तर सर्वच नोकरवर्ग निष्काळजी बनेल. त्यांचे नीतिधैर्य खचेल. परिणामी निर्णय घेण्यास कोणी पुढे येणार नाही. कोणत्याही प्रकरणात व्यक्तीपेक्षा घटनेवर किंवा कल्पनेवर टीका व्हावी. व्यक्ती एकमेकांवर टीका करीत राहिल्या तर परस्पर-सहकार्याची सर्वच कामे विघटतील व परिणामी कंपनीचे नुकसान होईल.

● “ आम्हांला खर्चावर कडक नियंत्रण आणलेच पाहिजे. बचत केलीच पाहिजे. तरच निभाव लागेल ! ”

कोणत्याही कंपनीत अनावश्यक खर्चांना आळा घालण्याने फायदा होईलच. पण बचत करण्याच्या लाटेत बरेचदा दूरगामी हिताच्या दृष्टीने आवश्यक उपक्रम बंद केले जातात. मशिनरी-दुरुस्तीची कामे पुढे ढकलली जातात. संशोधन व विकासाचे उपक्रम मध्येच बंद केले जातात. जाहिरातीला प्रचंड प्रमाणात कात्री लावली जाते. तरुण व नवीन कर्मचारीवर्ग काढून टाकला जातो. याचा परिणाम पुढच्या प्रगतीवर होतो व कंपनीचे एक पाऊल पुढे पडण्याऐवजी अधोगतीलाच सुरुवात होते. नजीकच्या काळात फायदेशीर दिसणारी बचत थोड्याच वर्षांत महाग पडल्याचे अनुभवास येते. बचतीच्या योजना फार विचारपूर्वक आखल्या जाव्यात.

योग्य प्रकारचे मनुष्यबळ ही कंपनीची खरी जिवंत मालमत्ता आहे. कंपनीच्या हितासाठी झटणारे अधिकारी जर कंपनीजवळ नसतील तर कितीही भारी किमतीची यंत्रसामग्री गंजतच पडणार व नुकसान भोगावे लागणार. वर दिलेल्या उदाहरणावरून योग्य तो बोध घेऊन जर कंपन्यांनी आपला अधिकारीवर्ग तपासून पाहिला, त्याचे नीतिधैर्य अजमावले, कंपनीच्या हितासाठी काम करण्याची तळमळ जागृत घेतली तर या मोल्यवान जिवंत मालमत्तेचा कंपनीची नेत्रदीपक प्रगती घडवून आणण्यास निश्चितच उपयोग करून घेता येईल. (आधारित)

---

घनःश्यामदास बिर्लांचे दीर्घायुष्य—जी. डी. बिर्लांच्या वयाला १ एप्रिल रोजी ८० वर्षे पूर्ण झाली. त्यांच्या उद्योग-समूहाची जिंदगी त्यांनी ५ कोटी रु. वरून १,००० कोटी रु. वर नेली आहे. त्यांनी अनेक उन्हाळे-पावसाळे पाहिले, परंतु दररोज सकाळी ५ च्या आत उठून एक मैल फिरावयास जाणे आणि रात्री ९ च्या आत झोपणे ह्या सवयीमुळे त्यांना आपले आरोग्य राखता आले आहे.

प्रदूषणाबद्दल उद्योगपतींना कारावास — इटलीमधील १७ उद्योगपतींना कारखान्यातील खराब पाणी नदीत सोडल्याबद्दल कैदेची शिक्षा झाली.

## आपल्यावरील अरिष्टांचे स्वरूप

विकसनशील समाजाचा अभ्यास करणाऱ्या संघटनेचे डायरेक्टर डॉ. रजनी कोठारी ह्यांनी भारतामधील केंद्रित राजकीय परिस्थितीवर कठोर टीका केली आहे. मुंबई येथे बोलताना ते म्हणाले की राजकीय सत्तेचे केंद्रीकरण झाले असतानाच विकेंद्रित आर्थिक व्यवस्था अमलात आणण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत. परंतु हे जमणार नाही. पूर्वी उलटी तऱ्हा होती. आर्थिक शक्तीचे केंद्रीकरण झाले होते आणि राजकीय सत्ता मात्र विकेंद्रित होती. केंद्रित राजकीय सत्तेमुळे देशावर संकटे कोसळतील आणि तो फुटण्याची शक्यता वाढत जाईल. सध्या देशावर कोसळलेल्या अरिष्टांचे स्वरूप राजकीय नाही अगर आर्थिकही नाही. त्याचे स्वरूप मानसिक दौर्बल्याचे व खोलवर रुजलेल्या भयगंडाचे आहे. भयाची सावली सर्वत्र पसरलेली दिसत आहे.

---

## पाकिस्तानला युद्धनौकांचा गुप्त पुरवठा

पाकिस्तान आणि ब्रिटन ह्यांनी एका गुप्त कराराप्रमाणे आधुनिक युद्धनौकांचा सौदा केला आहे. पाकिस्तानने ब्रिटन-कडून पाणबुडीविरोधी दोन युद्धनौका खरेदी केल्या आहेत. त्यासाठी पाकिस्तानला ३० लाख पौंड द्यावे लागले. अशाच आणखी दोन नौका पाकिस्तान खरेदी करणार आहे. ह्या नौकां-वरील रेडार व इतर काही सामग्री संपूर्णपणे नव्याने बसविण्यात आली आहे. पाकिस्तानजवळील युद्धनौका २८ ते ४३ वर्षांच्या जुन्या झालेल्या असून त्यांची संख्या अवघी ६ आहे. १९७१ मधील भारत-पाक युद्धात कराची बंदरावर हिंदी आरमाराने मोठा हल्ला चढविला होता. तेव्हापासून नाविक दलाचे सामर्थ्य वाढ-विण्याचा पाकिस्तानचा विचार चालू आहे. १९७३ साली हिंदी नौकादलाला पाकिस्तान घेत असलेल्या युद्धनौकांबद्दल विचारणा करण्यात आली होती. परंतु भारताच्या पसंतीस त्या उतरल्या नाहीत.

---

## आयातीसाठी चढत्या किमती, पण निर्यातीलाही जास्त किंमत मिळणार

१९७३ साली जागतिक बाजारपेठांत काही मालाला चांगला भाव मिळत होता. परंतु भारताला त्याचा फारसा फायदा घेता आला नाही. १९७४ साली भारताला काही महत्त्वाच्या मालाच्या आयातीबद्दल चढत्या किमती द्याव्या लागणार आहेत. त्यांत गहू, रासायनिक खते, लोहेतर खनिजे आणि तेल ह्यांचा समावेश आहे. १९७३ साली साखर आणि चहा ह्यांच्या किमती आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत फारशा वाढल्या नाहीत. १९७४ साली मात्र पहिल्या सहामाहीत साखरेची मागणी खूप वाढण्याचा संभव आहे. चहाच्या किमतीही बऱ्याच वर जाण्याची शक्यता आहे. त्याचा फायदा घेऊन भारताला आयातीसाठी द्यावी लागणारी चढती किंमत अंशतः भरून काढता येईल.

## स्वस्तिकने काढलेली जी आर पी हेलमेट्स

पोलादी शिरस्त्राणे पुरातन काळापासून सैनिकांच्या वापरामध्ये आहेत. दारूगोळ्याच्या शोधानंतर ह्या संरक्षक हेलमेटमध्ये सुधारणा होत गेली. पहिल्या जागतिक युद्धात पोलादी हेलमेट्सचा वापर खूप मोठ्या प्रमाणावर झाला. आर्टिलरी लढायात ह्या हेलमेटमुळे शार्पनेलचे तुकडे आणि उडती अस्त्रे ह्यांपासून बचाव होऊ शके. परंतु पोलादी हेलमेट फार जड असून डोक्यावर पेलणे अवघड जाई. अति उष्ण किंवा अति थंड हवेत ते त्रासदायक होई. (कारण पोलाद हे उत्कृष्ट तापवाहक आहे.) श्वासोच्छ्वासाचे मास्क आणि हेडफोन्स ह्यांच्या उपयोगात त्यांचा व्यत्यय येऊ लागला. डोक्याच्या कडा आणि मानेच्या वरचा भाग असंरक्षित राही.

अमेरिकनांनी त्यावर उपाय म्हणून नेटो हेलमेट काढले. आतील हेलमेट प्लॅस्टिकचे बनविले, ते बुलेटप्रुफ नव्हते. प्रत्यक्ष चकमकीच्या वेळी बाहेरील बुलेट प्रुफ हेलमेट त्यावर चढवावे लागे. तरी पण त्यात मूळ पोलादी हेलमेटच्या गैरसोई होत्याच.

आता संरक्षणखात्याच्या संशोधकांनी ग्लास रीइनफोर्स्ड प्लॅस्टिक हेलमेट शोधून काढले आहे. ते वजनाने हलके असून अधिक संरक्षणक्षम आहे. ग्लास फायबर रेझीन लॅमिनेटचे गुणधर्म पोलादापेक्षा सरस आहेत. पोलादी हेलमेटमध्ये लवचिकपणा फार कमी, त्यामुळे त्याला गोळी लागली तर तेथे कायमचा खड्डा पडतो; जी आर पी हेलमेटचा फक्त रंग उडून जातो.

जी आर पी हेलमेटच्या डिझाइनमुळे चष्मा, डोळ्यांची संरक्षणे आणि वायरलेस हेड सेट्स ह्यांच्या वापरात व्यत्यय न येता डोक्याच्या सर्व विभागांस भरपूर संरक्षण मिळते. हेलमेटच्या आतील थरापासून १५ मि मि. पेक्षा कमी अंतरावर कुठेही डोके असत नाही. हेलमेटचे वजन सुमारे एक किलोग्रॅम असते. (अमेरिकन नेटो हेलमेटचे वजन सुमारे १·४५ किलोग्रॅम असते) जंगलातील हालचालीसाठी ऑलिव्ह ग्रीन रंगात आणि वाळवंटातील हालचालीसाठी सँड स्टोन रंगात हे हेलमेट उपलब्ध असते.

जी आर पी हेलेमेटमुळे पोलिसांना आणि सैनिकांना जवळच्या अंतरावरून मारलेल्या पिस्तुलाच्या गोळ्यांपासून आणि रणांगणातील दुय्यम अस्त्रांपासून संरक्षण प्राप्त होते. लढाऊ सैनिकाला डोक्यावर वजनाचा भार वाटत नाही, सर्व हवामानात तो आपले काम अधिक चांगले आणि जास्त सुरक्षिततेने करू शकतो.

जनरल जे. एन. चौधरी (सेवानिवृत्त) ह्यांनी म्हटले आहे, "ग्लास रीइनफोर्स्ड प्लॅस्टिक (जी आर पी) हेलमेट्सचा वापर भारतीय सेना करू लागली असून पोलीसही तिचे अनुकरण करू लागतील. स्वस्तिक रबर प्रॉडक्टस लि. आता तयार करीत असलेल्या ह्या हेलमेटची उपयुक्तता, विशेषत: प्रखर हवामानात काम करणाऱ्या लष्करी व पोलीस दलांनी तपासून पाहाणे उपयुक्त ठरेल."

## इराकी शिष्टमंडळाची 'स्वस्तिक'ला भेट

### संरक्षण साहित्याची पाहणी

इराकच्या संरक्षण विभागातील आठ सदस्यांच्या एका शिष्टमंडळाने आज खडकी येथील स्वस्तिक रबर प्रॉडक्टसला भेट दिली. ऑर्डनन्स डायरेक्टर मे. ज. हशीम अब्दुल गफूर यांनी मंडळाचे नेतृत्व केले.

स्वस्तिकचे कार्यकारी संचालक श्री. वसंतराव वैद्य व श्री. जी. एस. वैद्य यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. पाहुण्यांनी नंतर फॅक्टरीमध्ये फेरफटका मारला. कारखान्याच्या कामकाजाबाबत त्यांनी विशेष औत्सुक्य दाखविले. स्वस्तिकच्या उत्पादनाचा दर्जा व गुणवत्ता पाहून पाहुणे प्रभावित झाले.

सदर इराकी शिष्टमंडळ भारतातील संरक्षण उत्पादन विभागांच्या खास दौऱ्यावर आले आहे. स्वस्तिकच्या भेटीला विशेष महत्त्व असण्याचे कारण म्हणजे स्वस्तिकच्या बुलेट प्रुफ हेलमेटच्या पाहणीसाठी मंडळ आले होते. सदर हेलमेटसूचे उत्पादन विशेषकरून संरक्षण विभागासाठी केले जाते. त्यांच्या निर्यातीबाबतच्या परिस्थितीवर मंडळाने चर्चा केली. पाहुण्यांनी नंतर कॉंबॅट बुटस्, जंगल बुटस्, वॉटर टँक्स, कॅमॉफ्लेज नेट इत्यादी स्वस्तिकच्या संरक्षण उत्पादनांची पाहणी केली व याबाबतही विशेष रस घेतला.

---


**मुख्य मंत्र्याची दिल्लीमधील बैठक** — चालू वर्षाच्या पहिल्या ५१ दिवसांपैकी ३९ दिवस मध्यप्रदेशचे मुख्य मंत्री श्री. सेठी हे भोपाळमध्ये नव्हते. ह्या ३९ दिवसांपैकी २९ दिवस त्यांचे वास्तव्य दिल्लीमध्ये होते.

**पुण्यातील ऑटोरिक्षा मीटर्सना बांगला देशाची मागणी** — डायमंड वॉच मॅन्युफॅक्चरिंग कंपनीला बांगला देशाकडून १,५०० ऑटोरिक्षा मीटर्सची ऑर्डर मिळाली आहे. त्यांची किंमत सुमारे ३ लक्ष रु. आहे. ही कंपनी दरमहा १,००० मीटर्स तयार करू शकते. मीटरमधील हेअर स्प्रिंग आणि बॅलन्स स्क्रू हे दोन भाग आयात केलेले असतात.

**नोंदलेल्या रोजगार-इच्छुकात वाढ** — उद्योग-विनिमय-केंद्रातून नोंदलेल्या रोजगार-इच्छुकांची संख्या फेब्रुवारी १९७४ अखेर ८१·८० लक्ष होती; फेब्रुवारी १९७३ अखेर ती ७१·४७ लक्ष होती. म्हणजे, एका वर्षात तिच्यामध्ये १४·५% वाढ झाली. फेब्रुवारी १९७४ मध्ये ४,०७,९३६ नव्या नोंदी झाल्या, तर ३८,६९२ बेकारांना काम मिळाले.

**वाडेकर संघाला एच.एम.टी. घड्याळ बक्षीस** — इंग्लंडला जाण्यास भारतीय क्रिकेट संघ निघण्यापूर्वी त्यातील प्रत्येक खेळाडूला (मॅनेजर हेमू अधिकारीला सुद्धा) हिंदुस्तान मशीन टूल्स लि. ने ऑटोमॅटिक डे-डेट मनगटी घड्याळ बक्षीस दिले.

"भिडे" ओव्हर पिक
पॉवर लूम्स ५६," ६०" व ६४"



# भिडे ॲन्ड सन्स प्रा. लि;

—सांगली—

रघुनाथराव भिडे
कार्यकारी संचालक

फोन नं. २०६९.






सोल सेलींग अेजन्टस्

## नोगी सेलस् कॉर्पोरेशन

१७७ जगन्नाथ शंकरशेठ रोड, मुंबई २. बी आर.

MARATHI



" नवभारताच्या उभारणीमध्ये सहकारी चळवळ फार महत्त्वाची भूमिका पार पाडीत आहे. "

—पं. जवाहरलाल नेहरू

*महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची प्रेरक शक्ती*

# दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

मुख्य कार्यालय :
फोर्ट, मुंबई १.
मुंबईतील शाखा २१

प्रादेशिक कार्यालय :
महाल, नागपूर
नागपूरमधील शाखा ५

| | |
|---|---|
| भांडवल व निधी | रु. २१ कोटी |
| ठेवी | रु. १०४ कोटी |
| दिलेली कर्जे | रु. १४९ कोटी |
| खेळते भांडवल | रु. २०५ कोटी |

**सामुदायिक हितासाठी झटणारी आगळी बँक**



BANK TO BANK...

# THE BELGAUM BANK LIMITED

( SCHEDULED BANK )

*Regd. & Head Office* : **659–60, Raviwar Peth**

**BELGAUM**

Invest in our "Family Benefit Deposit Scheme" and earn Monthly Interest as a Pension – Enquire at any of our 42 Branches – Our Bombay Office at Mandvi, Bombay – 9. & Bangalore Office at 61, Chowdeshwari Temple Street, Bangalore – 2.

OUR MOTTO IS SERVICE
AND WE REALLY SERVE.

S. Y. KAMAT,
*General Manager.*

# बँकेची प्रगती उत्पादक कर्जांवर अवलंबून काटेकोर कारभाराची आवश्यकता

( श्री. आर. डी. कुलकर्णी, बी. ए., जी. डी. सी. अँड ए. )

विजयग्राम ही मध्यमवर्गीय नागरिकांकडून नजीकच स्थापण्यात आलेल्या एका औद्योगिक व्यापारी संस्थेशी संलग्न असलेली २०–२५ हजार लोकसंख्येची स्वतंत्र टुमदार छोटीसी वसाहत असून तिजमध्ये मुख्यत्वे छोटे शेतकरी व व्यापारी, मध्यमवर्गीय नागरिक व कामगार राहात असत. ही वसाहत संबंधित औद्योगिक संस्थेपासून ८-१० मैल दूर असल्याने तिच्या नागरिकांची योग्य प्रकारे अवश्य ती बँकिंगची सोय व्हावी या दृष्टीने तिचे काही प्रतिष्ठित नागरिकांकडून तेथील रहिवाशांची सभा घेण्यात येऊन नियोजित 'विजयश्री नागरी सहकारी बँक लि., विजयग्राम' या नावाची बँक स्थापण्याचा सदरील सभेत एकमताने निर्णय घेण्यात आला व या नियोजित बँकेचे पोटनियमांचा मसुदा व प्रमोटर्सची नावे मान्य करून, त्यांच्यापैकी ११ सदस्यांचे भावी व्यवस्थापक मंडळ नियुक्त करण्याचा एकमताने निर्णय घेण्यात येऊन त्यांना, बँकेचे रीतसर रजिस्ट्रेशन करवून घेणे, तिचे पोटनियम मंजूर करवून घेणे व बँकेचे कामकाज सुरू करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्याचे सर्व अधिकार देण्यात आले.

उपरिनिर्दिष्ट नियोजित बँकेचे पोटनियम तज्ज्ञ सल्लागारांकडून योग्य प्रकारे तयार करवून घेण्यात आले असल्याने व या बँकेची विजयग्राम येथे खरोखरच आवश्यकता असल्याने, तिच्या नियोजित व्यवस्थापक मंडळांतील कार्यकर्त्यांचा दर्जा व उत्साह लक्षात घेता, या बँकेचे रीतसर रजिस्ट्रेशन होऊन तिचे पोटनियम मा. रजिस्ट्रार, सहकारी खाते, यांच्याकडून मंजूर करण्यात आले व नियोजित बँक स्थापनेचे प्रकरणी शिफारस करण्यात आल्याप्रमाणे नियोजित बँकेचे संचालकमंडळ सुरुवातीच्या तीन वर्षांकरिता पोटनियमांतील तरतुदीनुसार सरकारकडून नियुक्त करण्यात आले. या संचालकमंडळात बँकेच्या प्रमोटर्सपैकी ९ व बँकेचे सुरुवातीचे भाग भांडवलात काही अंशी सरकार सहभागी झाल्याने, त्याची बँकेकडून परतफेड होईपर्यंत त्यांचे दोन प्रतिनिधी, असे एकूण ११ सदस्य होते संचालकमंडळाचे अध्यक्ष म्हणून त्याचे नियुक्त ११ सदस्यांपैकी श्री. प्रफुल्लचंद्र या तडफदार, उत्साही व कर्तबगार प्रमोटरची नियुक्ती करण्यात आली. या नवीन बँकेचे काम सुरुवातीपासून नियमांनुसार चालविण्याचे दृष्टीने, या बँकेचा व्यवस्थापक म्हणून सुरुवातीच्या तीन वर्षांकरिता, एक अनुभवी वरिष्ठ सरकारी अधिकारी, श्री. विद्याधरराव यांना बँकेचे नूतन व्यवस्थापक मंडळाचे विनंतीनुसार नियुक्त करण्यास सरकारने मान्यता दिली आणि या व्यवस्थापकाचे सल्ल्याने, व्यवस्थापक मंडळाने, बँकेतील अकौंटंट म्हणून श्री. बुद्धिवंतराव यांची तसेच, कॅशिअर, कारकून, शिपाई, वॉचमन इत्यादींची नेमणूक केली. बँकेच्या कामकाजाचा शुभारंभ एका सुमुहूर्तावर विजयग्राम येथील श्री. औक्षवंतराव नावाच्या एका वयोवृद्ध व विद्वान नागरिकांच्या शुभहस्ते, त्यांच्या नावाचे पहिले सेव्हिंग्ज बँक खाते उघडून करण्यात आला. पहिल्याच दिवशी बँकेमध्ये एकूण १५१ ठेवींची खाती उघडण्यात आली.

वरीलप्रमाणे सुरू झालेल्या बँकेचे कामकाजास विजयग्राम येथील नागरिकांनी सुरुवातीपासून उत्तम प्रकारे प्रतिसाद दिल्याने सुरुवातीच्या ४–५ वर्षांमध्ये बँकेच्या ठेवी, कर्जवाटप वगैरे व्यवहारात प्रशंसनीय अशी प्रगती दिसून आली व त्यामुळे तिला अल्पावधीतच सभासदांना त्यांच्या शेअर्सवर डिव्हिडंड, बँकेतील कर्मचाऱ्यांना बोनस व इतर काही उत्तेजक सवलती देणे शक्य झाले.

वर नमूद केल्याप्रमाणे बँकेची द्रुत गतीने प्रगती होत गेल्याने, सरकारचे भागभांडवल ५ वर्षांमध्ये बँकेने परत केले व सरकारी खात्याकडून बँकेकडे नियुक्त करण्यात आलेले पहिले व्यवस्थापक श्री. विद्याधरराव हे त्यांची बँकेकडील मुदत संपल्यानंतर त्यांच्या खात्याकडे तेथील कामाची निकड लक्षात घेता, परत गेले व त्यांच्या जागी श्री. विजयराव या होतकरू, प्रशिक्षित तरुणाची व्यवस्थापक म्हणून संचालक मंडळाने नियुक्ती केली. तसेच सुरुवातीची तीन वर्षांची मुदत संपल्यानंतर पोटनियमाप्रमाणे निवडणूक होऊन सभासदांनी निवडलेले संचालकमंडळ ( सरकारी भागभांडवल फिटेपर्यंत ९ सदस्यांचे व ते फिटल्यानंतर ११ सदस्यांचे ) अस्तित्वांत येऊ लागले. या निवडून आलेल्या संचालक मंडळामध्ये बहुंशी प्रमोटर्सपैकीच सदस्य, त्यांना कामाचा पूर्वानुभव असल्याने, निवडण्यात आले व अध्यक्षही सुरुवातीचेच, कामाची सुसंगतता राखण्याच्या दृष्टीने चालू ठेवण्यात आले. बँकेचे संचालक मंडळाचे अध्यक्ष, व इतर सदस्य, तसच व्यवस्थापक, अकौंटंट व इतर कर्मचारी यांची बँकेच्या ग्राहकांशी वागणूक अत्यंत सौजन्यपूर्ण अशी होती.

वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे बँकेची उत्तरोत्तर अशी अधिकाधिक प्रगती होऊ लागल्याने तिचे धंद्याचे क्षेत्र अधिक विस्तृत करण्याचे प्रयत्न जारीने करण्यात यावेत व त्यासाठी बँकेचे अधिकृत भागभांडवलाची मर्यादा वाढविणेत यावी अशा आशयाचा या बँकेच्या संचालक मंडळाने एकमताने निर्णय घेतला व त्यास अवश्य ती बँकेच्या सर्वसाधारण सभेची व मा. रजिस्ट्रार, सहकारी खाते यांची मान्यता मिळविण्यात आली. दरम्यान या बँकेच्या होत असलेल्या उत्साहजनक प्रगतीचा अप्रत्यक्ष परिणाम तिच्याकडील ठेवींच्या रकमेत सातत्याने वाढ होण्यात झाला व अशा प्रकारे जमलेल्या वाढीव ठेवींचा उपयोग, नियमाप्रमाणे तरत्या भांडवलाची आवश्यक तेवढी पूर्तता करून कर्जरूपाने रकमा गुंतविण्यात होऊ लागला व त्यामुळे बँकेस प्रतिवर्षी होणाऱ्या नफ्याच्या रकमेत वाढ होऊ लागली व त्याचा परिणाम सभासदांना अधिक डिव्हिडंड व कामगारांना अधिक पगारवाढ व बोनस मिळण्यात होऊ लागला. ठेवीदारांच्या वाढत्या ठेवींमधून कर्जवाटपाची पूर्तता होऊ लागल्याने

बँकेच्या अधिकृत वाढीव भागभांडवलाची कार्यवाही करण्याचे काम मागे पडत गेले.

वर नमूद केल्याप्रमाणे बँकेस सातत्याने जरी नफा होत असला तरी बँकेचे हिशेबतपासनिसांनी त्यांच्या वार्षिक तपासणी यादीत बँकेने ठेवीदारांचा जो विश्वास संपादन केला आहे त्याबद्दल प्रशंसोद्गार काढून, बँकेने कर्जवाटप करताना, कोणत्या प्रकारच्या ठेवींमधून रकमा, कोणत्या प्रकारच्या कर्जवाटपात किती प्रमाणात गुंतवाव्यात; भाग भांडवल, ठेवी व कर्जवाटप यांचे सर्वसाधारणपणे परस्पर प्रमाण कसे असणे जरूर आहे इत्यादी बाबींसंबंधी वेळोवेळी मार्गदर्शन केले होते. पण बँकेस प्रतिवर्षी, सातत्याने सुरुवातीची काही वर्षे नफा होत गेल्याने, हिशेबतपासनिसांचे त्यांच्या यादीतील वरील आशयांच्या अभिप्रायांची व त्यावरील ऑफिसच्या टिपणांची नोंद घेण्यापलीकडे बँकेचे व्यवस्थापक मंडळ व साधारण सभा यांच्याकडून काही अन्य कृती होऊ शकली नाही.

याप्रमाणे अंदाजे १५ वर्षे बँकेचा व्यवहार कोणतीही अडचण न येता चालू राहिला; परंतु या कालावधीनंतर एकंदर औद्योगिक उत्पादनाच्या क्षेत्रात सर्व स्तरामध्ये मंदीची लाट येऊ लागली व तिचा नैसर्गिक काहीसा परिणाम बँकेच्या कामकाजावर होणे अपरिहार्य होते. अशा परिस्थितीत बँकेचे ठेवीदारांकडून बँकेतील त्यांच्या ठेवी अधिक प्रमाणात हळूहळू काढण्यात येऊ लागल्या परंतु कर्जाची वसुली वक्तशीर होईनाशी झाली. परंतु वर उल्लेखल्याप्रमाणे ठेवीदारांच्या ठेवींपैकी बराचसा भाग बँकेकडून कर्जवाटपामध्ये गुंतविला गेला असल्याने व ही कर्जपरतफेड द्रुतगतीने होणे शक्य न झाल्याने ठेवीदारांच्या रकमा परत करणेस बँकेस वारंवार अडचणी येऊ लागल्या व त्यामुळे तिचे चोख कामकाजासंबंधी जनतेमध्ये हळूहळू चर्चा होऊ लागली. अशा परिस्थितीत बँकेचे संचालक मंडळ, त्यांनी सभासदांना कर्जवाटप जरी योग्य तारण पाहून केले होते तरी, बँकेचा मुख्य कणा जो ठेवीदार तो बँकेच्या कार्यक्षम कामकाजाविषयी साशंक बनतो आहे हे पाहून, चिंतातुर झाले व या अडचणीतून निकडीने योग्य मार्ग काढण्यासाठी, बँकेच्या व्यवहाराची संपूर्ण छाननी करून तातडीने पुढील योग्य उपाययोजना सुचविण्यासाठी त्यांनी श्री. विश्वबंधुराव या तज्ज्ञ व्यक्तीची नियुक्ती केली. श्री. विश्वबंधुराव यांनी बँकेच्या मागील सर्व वर्षांच्या महत्त्वाच्या आर्थिक व्यवहारांची व ताळेबंदाची छाननी करून त्यामध्ये बँकेच्या हिशेब तपासनिसांनी त्यांच्या तपासणीयादीत केलेल्या सूचना लक्षात घेऊन, उपाययोजना सुचविणारा सविस्तर अहवाल बँकेच्या संचालक मंडळाकडे पाठविला व त्यात असे विशेषत्वाने नमूद केले की, बँकेने या सूचनांची त्वरित काटेकोर रीत्या कार्यवाही केली तर बँक तिच्या सध्याच्या अडचणीतून हळूहळू मुक्त होऊन पूर्वीप्रमाणे जनतेचा विश्वास संपादन करू शकेल. बँकेचे संचालक मंडळ, अध्यक्ष श्री. प्रफुल्लचंद्र, व्यवस्थापक श्री. विजयराव, अकौंटंट श्री. बुद्धिमंतराव व इतर कर्मचारी या सर्वांचा बँकेची निष्ठापूर्वक सेवा करण्याचा दृढनिश्चय असल्याने त्यांनी एकजुटीने श्री. विश्वबंधुराव या बँकिंग तज्ज्ञाच्या सूचनांप्रमाणे बँकेच्या कामात काळजीपूर्वक योजना व कार्यवाही सुरू केली आणि त्याचा सुपरिणाम बँकेच्या व्यवहारासंबंधी ठेवीदारांच्या विश्वासाचे पुनरुज्जीवन व अंतिम बँकेच्या प्रगतिपर कामकाजामध्ये दृग्गोचर होऊ लागला आणि लवकरच बँकेने आपले पूर्वीचे मानाचे स्थान प्राप्त करून घेतले व ते सातत्याने वर्धिष्णू ठेवले.

श्री. विश्वबंधुराव यांच्या उपरिनिर्दिष्ट सूचनांचा सारांश असा होता की, बँकेने किंवा कोणत्याही व्यक्तीने वा संस्थेने आपल्या कार्यात नुसते उत्पादन वाढवून भागणार नाही तर त्यांच्या प्रत्येक व्यवहारामधील तांत्रिक उत्पादकता कशी वाढेल इकडे जाणीवपूर्वक सर्व स्तरांमध्ये शिकस्तीच्या निष्ठेने प्रयत्न केले गेले पाहिजेत. श्री. विश्वबंधुराव यांनी त्यांच्या वरील सूचनांचे द्वारा, आजच्या विचारवंत वाचकबंधूंना, 'उत्पादकतेच्या' किती मौलिक अशा व्यवस्थापकीय तंत्राचे विवेचन केले असेल याची कल्पना येऊ शकेल.

## गाईचे दूध अधिक किफायतशीर


### आता म्हशींची जागा गाई घेणार

म्हशीच्या दुधापेक्षा गाईचे दूध अधिक किफायतशीर ठरते, असा भारतीय डेअरीतज्ज्ञांचा अभिप्राय आहे. आरे मिल्क कॉलनीने केलेल्या पाहणीचे निष्कर्ष असे आहेत : म्हशीच्या दुधात फॅटचा अंश ६.५% तर गाईच्या दुधात फक्त ४.५% असतो तरी सुद्धा तिच्यावरील खर्चाच्या मानाने गाय अधिक दूध देते. सरकारी केंद्रात दररोज म्हशीला ६.२३ रु. चे खाद्य लागते तर गाईला ४.७१ रु. चे खाद्य पुरते. कृत्रिम गर्भधारणेच्या बाबतीत म्हशींच्या बाबतीत ५०%तर गाईच्या बाबतीत ६०% यश लाभते. आरे येथील खासगी मालकीच्या गाई दररोज सरासरीने ६.८० कि. ग्रॅ. दूध देतात तर म्हशी ५.४ कि. ग्रॅ. दूध देतात, त्यामुळे त्यांना गाईच जास्त किफायतशीर वाटत आहेत. म्हैसूर आणि पंजाब राज्यांनी चांगल्या जातीच्या (क्रॉसब्रीड) गाई निर्माण करण्याचे बाबतीत अग्रस्थान मिळविले आहे आणि महाराष्ट्राला त्या राज्यातून गाई आयात कराव्या लागतात. महाराष्ट्राच्या क्षेत्रकी सात्याने ह्या बाबतीत केलेली हालचाल निराशाजनक आहे.

### श्री. व्ही. एम. भिडे, ॲग्रिकल्चर फिनॅन्स कॉर्पोरेशनचे चेअरमन

श्री. व्ही. एम. भिडे, बँक ऑफ महाराष्ट्राचे चेअरमन आणि मॅनेजिंग डायरेक्टर, ह्यांची ॲग्रिकल्चरल फिनॅन्स कॉर्पोरेशनच्या चेअरमनचे जागी कॉर्पोरेशनच्या संचालक मंडळाने एकमताने निवड केली आहे.

IMPORT
SUBSTITUTE
GADRE KEYS




ALL TYPES AS
PER SPECIFICATION

GADRE BROTHERS MADHAVNAGAR (MAHARASHTRA)
PHONE NO. 2318 GRAM: "SEWA"

Swastik FOAM

cosy
sitting
pleasure!





SWASTIK RUBBER PRODUCTS LTD.
PUNE-411003

★ कार्यक्षमतेचा शिक्कामोर्तब ★

विजय पंपस् कार्यक्षमतेत नेहमीच आघाडीवर—
आता—भारतीय मानक संस्थेकडून विजय पंपास I. S. I. मार्क * दर्जेदार पंप निर्मितीची हमी.

इंजिन असो अगर इले. मोटार असो,
त्यांस "विजय" पंपाची
आवश्यकता आहेच.





कारखानदार—
फोन : २१२
तार : Vijayplow

न्यू विजय इंडस्ट्रीज लि.

विश्रामबाग—सांगली ( महाराष्ट्र )

# सरदारगृह

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.

मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

♣

आमची वैशिष्ट्ये

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक

♣

फोन नं. :- ३०३३७] सरदारगृह प्रा. लि [ तार–सरदारगृह

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.



# दि कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि.

६११ सदाशिव पेठ. कुंटे चौक. लक्ष्मीरोड. पुणे ३०

( फोन नंबर ५३७८३ )

| | |
|---|---|
| **शाखा नं. १** | **शाखा नं २** |
| पर्वतीदर्शन | मुंबई-पूना रोड, बोपोडी |
| हॉटेल होन्याचे वर | जकात नाक्याजवळ |
| पुणे – ९ | पुणे – ३ |
| ( फोन नं. ४१३८६ ) | |

१. आपली ठेव/शिल्लक कॉसमॉस बँकेच्या विविध ठेव योजनांमध्ये गुंतवून जास्तीत जास्त व्याज मिळवा.

२. कॉसमॉस बँकेच्या विविध कर्जयोजनांचा अवश्य फायदा घ्या. (भाडेकरार, तारण, जामिनकी इत्यादी.)

३. कॉसमॉस बँकेच्या सहकार्याने लघुउद्योग सुरू करून आपला, बँकेचा व आपल्या देशाचा उत्कर्ष साधा.

४. मासिक ठेव व्याजयोजनेचा अवश्य फायदा घ्या.

आपल्या बँकिंगच्या सर्व गरजांसाठी आजच भेटा.

| | | |
|---|---|---|
| **गो. वा. पुजारी** | **शं. गो. बर्वे** | **भास्करराव रवडे** |
| व्यवस्थापक | उप-कार्याध्यक्ष | कार्याध्यक्ष |



★ ★ ★

# धनवर्धिनी परंपरेतील

## ११ ४ नवीन योजना

### कर्जहमी ठेव योजना

ठेव परतीचे वेळी तितकेच कर्ज मिळण्याची सुरवातीलाच हमी

### विशेष सेव्हिंग्ज खाते

८:७५ टक्के व्याज, पैसे काढताना ९१ दिवसाची पूर्व सूचना.

### मुदतीचे सेव्हिंग्ज खाते

७:२५ टक्के व्याज

मुदत ३ ते ६ वर्षे

### मासिकव्याज ठेव योजना

किमान १००० रु. (अथवा त्यापट)

कमीत कमी १ वर्ष मुदत.

युनायटेड वेस्टर्न म्हणजेच धनवर्धन

एका राज्यात शाखा असलेल्या बँकांमधील भारतातील सर्वात मोठी व्यापारी बँक

## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.

मुख्य कार्यालय: युनायटेड वेस्टर्न बँक इमारत, सातारा २.

★ ★ ★

## आम्ही आता आपल्या ठेवींवर
## दरमहा व्याज देतो.

आपल्या मासिक जमाखर्चाची तोंडमिळवणी करण्यास आमचाही हातभार व्हावा या हेतूने आम्ही ही नवी ठेवयोजना निर्मिली आहे. आपण किमान रु. १००० अथवा त्याच्या पटीत रक्कम आमच्याकडे मासिक व्याज ठेवयोजनेखाली किमान २४ महिनेपर्यंत ठेवा.

आमच्याकडून दरमहा मिळणाऱ्या व्याजातून आपण आपले भाडे, विद्युत बिल, टेलिफोन बिल, गॅस बिल, अशापैकी कोणतेही एक अथवा अनेक खर्च भागवू शकता.

**दरमहा व्याज मिळत राहून मूळ ठेव सुरक्षित राहते**
**हे ह्या योजनेचे वैशिष्ट्य आहे.**

अधिक तपशिलाकरिता नजीकच्या आमच्या शाखेस आजच भेट द्या.

# बँक ऑफ महाराष्ट्र

हेड ऑफिस – ११७७, बुधवार पेठ, पुणे – २

# नहीं—
# यह कोई
# साधारण कार्य नहीं!

# सरदार

## सोडा वाटर
## यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और पूरबी देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सैनिकी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और कार्यालय आदि में ये कितने ही यंत्र गत २० वर्षोंसे काम देते आये हैं।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोडे ही काल में कई गुना मुबदला मिल जाता है।

हमारे दूसरे विक्रेय हैं: १. रंगहीन द्रव कार्बन डायऑक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है. २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**



[illegible] सोडा वाटर यंत्र — घरेलू सोडा वाटर यंत्र

## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड

हर विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.

फोन: कार्यालय: २५३३७१ कारखाना [illegible]


हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाविलास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४११००४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)